# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

## जाहिर सूचना

**विषय: उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात विनापरवानगी अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स, होर्डीग, जाहिरात फलक, पताका, झेंडे, कमानी, इत्यादी न लावण्याबाबत.**

**संदर्भ: १. जनहित याचिका क्रमांक १५५/२०११ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेले आदेश.**
**२. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम [आकाशचिन्हे (स्कायलाईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण] नियम, २०२२.**

उल्हासनगर शहरातील सर्व राजकीय पक्ष तसेच नागरीकांच्या निदर्शनास आणण्यात येते की, मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्रमांक १५५/२०११ मध्ये शहरात कोणत्याही ठिकाणी विनापरवानगी अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स, होर्डीग, जाहिरात फलक, झेंडे, पताका, कमानी इत्यादी लागणार नाहीत या दृष्टीने कारवाई करण्याचे तसेच विनापरवानगी अनधिकृत फलक प्रदर्शित करणा-यांविरुध्द पोलिस स्टेशनला गुन्हे दाखल करण्याचे देखिल आदेश दिलेले आहेत.

त्या अनुषंगाने माहे सप्टेंबर २०२३ मध्ये गोपाळकाला, सार्वजनिक गणेश उत्सव, माहे ऑक्टोबर २०२३ मध्ये सार्वजनिक नवरात्र उत्सव, दसरा तसेच माहे नोव्हेंबर २०२३ मध्ये दिवाळी असल्यामुळे शहरात मोठया प्रमाणात विनापरवानगी अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स, होर्डीग, जाहिरात फलक प्रदर्शित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी उल्हासनगर शहरातील सर्व राजकीय पक्ष व नागरीकांना सुचित करण्यात येते की, उल्हासनगर शहरात कोणत्याही ठिकाणी विनापरवानगी अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स, होर्डीग, जाहिरात फलक, झेंडे, पताका, कमानी इत्यादी लागणार नाहीत याची दक्षता घ्यावी. शहरात कोणत्याही ठिकाणी विनापरवानगी अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स, होर्डीग, जाहिरात फलक, झेंडे, पताका, कमानी इत्यादी लागल्याचे निदर्शनास आल्यास संबधिताविरुध्द "महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास प्रतिबंध करण्याकरिता अधिनियम १९९५" मधील तरतुदीनुसार गुन्हे दाखल करण्याची तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम [आकाशचिन्हे (स्कायलाईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण] नियम, २०२२ मधील तरतुदीनुसार दंड वसुल करण्याची कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात विनापरवानगी अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स, होर्डीग, जाहिरात फलक, झेंडे, पताका, कमानी इत्यादी लागल्याचे निदर्शनास आल्यास शहरातील नागरिकांनी खालील माध्यमांवर तक्रारीची नोंद करावी.

१. टोल फ्री दुरध्वनी क्रमांक-१८००२३३११०१.
२. E-Mail Id- illegalhoarding@umc.gov.in.
३. Complaint Portal-www.umc.gov.in.

(मा. प्रशासक तथा आयुक्त् यांचे मान्यतेने)

(जमीर लेंगरेकर)
अतिरिक्त आयुक्त (शहर)
उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक: १७ जुलै, २०२३.